जागतिक बॅन्क सहाय्यित "तंत्रशिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी भारत सरकारचा कार्यक्रम" (Technical Education Quality Improvement Programme of Government of India-TEQIP) अंतर्गत निवड झालेल्या संस्थांसाठी नियामक मंडळे गठीत करणेबाबत

# महाराष्ट्र शासन

उच्च व तंत्रशिक्षण विभाग,
शासन निर्णय क्र.डब्ल्यूबीपी २००४/(४०९/०४)/तांशि-६,
मंत्रालय विस्तार भवन,मुंबई-४०००३२.
दिनांक : २२ जून,२००४.

संदर्भः- १) शासन निर्णय, उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र.डब्ल्यूबीपी २००४/(३४१/०४)(१)/तांशि-६, दि.३१ मार्च,२००४.
२) शासन शुध्दीपत्रक उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र.डब्ल्यूबीपी २००४/(३४१/०४)(१)/तांशि-६, दि. ८ जून,२००४.

**प्रस्तावना:-**

जागतिक बॅन्क सहाय्यित "तंत्रशिक्षणाचा दर्जा सुधारण्यासाठी भारत सरकारचा कार्यक्रम" (Technical Education Quality Improvement Programme of Government of India-TEQIP) राज्यातील तंत्रशिक्षण संस्थांमध्ये राबविण्यास संदर्भाधीन क्र.१ येथील दि.३१ मार्च,२००४ च्या शासन आदेशान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. सदर शासन आदेशातील तरतुदीनुसार प्रकल्पांतर्गत निवड झालेल्या/होणाऱ्या संस्थांसाठी सोसायटी स्थापन झाल्यानंतर नियामक मंडळाची नियुक्ती करणे आवश्यक आहे. यासाठी प्रकल्पांतर्गत निवड झालेल्या संस्थांसाठी नियामक मंडळ गठीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णयः-** या शासन निर्णयान्वये आता प्रकल्पांतर्गत निवड झालेल्या खालील संस्थांसाठी नियामक मंडळे गठीत करण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

१) वीरमाता जिजाबाई टेक्नॉलॉजीकल इन्स्टिटयुट, मुंबई - प्रपत्र-अ
२) पुणे इन्स्टिटयुट ऑफ इंजिनियरिंग ॲण्ड टेक्नॉलॉजी, पुणे (पूर्वीचे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, पुणे ) - प्रपत्र-ब
३) मुंबई युनिव्हर्सिटी इन्स्टिटयुट ऑफ केमिकल टेक्नॉलॉजी, मुंबई - प्रपत्र-क
४) श्री गुरू गोविंदसिंगजी अभियांत्रिकी व तंत्रशास्त्र महाविद्यालय, नांदेड - प्रपत्र-ड

२. वरील संस्थांच्या नियामक मंडळात नियुक्त केले जाणारे अध्यक्ष व सदस्य हे सोबत जोडलेल्या त्या त्या प्रपत्रानुसार असतील.

३. नियामक मंडळाने अध्यक्ष व सदस्यांना संबंधित संस्था खालीलप्रमाणे सुविधा उपलब्ध करून देईल.

१) प्रधान सचिव यांच्या दर्जाप्रमाणे विमान प्रवास/वाहन भत्ता
२) रू.१०००/- बैठक भत्ता

४. संदर्भाधीन क्र.१ येथील दि.३१ मार्च,२००४ च्या शासन निर्णयातील नियामक मंडळाबाबतच्या तरतुदी संबंधित संस्थांच्या नियामक मंडळास लागू राहतील. तसेच नियामक-मंडळाचे अधिकार व कर्तव्ये दि.३१ मार्च,२००४ च्या शासन निर्णय सोबतच्या परिशिष्ट-१ मध्ये नमूद केल्याप्रमाणे असतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( मनीषा शिंत्रे )
उपसचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१) मा.राज्यपाल तथा कुलपती यांचे प्रधान सचिव, राज भवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा.मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) मा.राज्यमंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मुख्य सचिव, यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
७) सचिव, मनुष्यबळ विकास मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली.
८) सचिव, आर्थिक कार्य विभाग, भारत सरकार, नवी दिल्ली.
९) सचिव, विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली.
१०) संचालक, राष्ट्रीय परियोजना कार्यान्वयन एकक, नोएडा (यु.पी.)
११) संचालक, टेक्नीकल टिचर्स ट्रेनिंग इन्स्टिटयुट, भोपाळ.
१२) संचालक, ऑल इंडिया कौन्सिल फॉर टेक्नीकल एज्युकेशन, नवी दिल्ली.
१३) संचालक, इंडियन इन्स्टिटयुट ऑफ टेक्नॉलॉजी, मुंबई.
१४) प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५) प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१६) प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१७) सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१८) सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९) सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
२०) महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई.
२१) संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२२) संचालक, उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
२३) कुलसचिव, सर्व विद्यापीठे,
२४) प्राचार्य, सर्व शासकीय/ अनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालये,
२५) प्राचार्य, सर्व शासकीय / अनुदानित तंत्रनिकेतने,
२६) सर्व विभागीय सहसंचालक, तंत्रशिक्षण.
२७) सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई.
२८) सर्व अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
२९) महालेखापाल (लेखा परीक्षा), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
३०) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
३१) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
३२) निवासी लेखा अधिकारी, मुंबई.
३३) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, मुंबई.
३४) वित्त विभाग, व्यय-५, मंत्रालय, मुंबई.
३५) वित्त विभाग, अर्थोपाय शाखा, मंत्रालय, मुंबई.
३६) उच्च व तंत्रशिक्षण विभागातील सर्व कार्यासने.
३७) संचालक, संबंधित संस्था
३८) संबंधित संस्थांच्या नियामक मंडळाचे अध्यक्ष / सदस्य
३९) निवड नस्ती/तांशि-६.

शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण क्र.डब्ल्युबीपी २००४/(४०९/०४)/तांशि-६,
. दि. २२ जून,२००४ सोबतचे

**प्रपत्र-अ**

**संस्थेचे नांव :- वीरमाता जिजाबाई टेक्नॉलॉजीकल इन्स्टिटयुट, मुंबई**
**नियामक मंडळाची रचना**

१ - अध्यक्ष - श्री.नस्ली वाडीया, अध्यक्ष, बॉम्बे डाईंग लि., मुंबई (शासनामार्फत नियुक्ती)

५ - सदस्य (शासनामार्फत नियुवती)

(अ) श्री.आनंद महिंद्रा, उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, महिंद्रा अॅण्ड महिंद्रा, मुंबई.

(ब) श्री.अदी गोदरेज - अध्यक्ष, गोदरेज अॅण्ड बॉयस मॅन्युफॅक्चरिंग कं.लि., मुंबई.

(क) डॉ.अनिल काकोडकर - अध्यक्ष, अॅटोमिक एनर्जी कमिशन, मुंबई.

(ड) श्री.अशोक जोशी - संचालक, इंडियन इन्स्टिटयुट ऑफ कॉस्ट अॅण्ड मॅनेजमेंट स्टडीज अॅण्ड रिसर्च, पुणे.

(ई) प्रा.अ.प.कुडचडकर - संचालक, धिरूभाई अंबानी इन्स्टिटयुट ऑफ इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी, गांधीनगर.

१ - सदस्य - संचालक, आय.आय.टी., मुंबई किंवा तत्सम राष्ट्रीय नामांकित संस्था (डॉ.मिश्रा, संचालक, आय.आय.टी. पवई, मुंबई)

१ - सदस्य - प्रधान सचिव/ सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन (पदसिध्द)

१ - सदस्य - प्रधान सचिव/ सचिव, वित्त विभाग, महाराष्ट्र शासन (पदसिध्द)

१ - सदस्य - संस्थेच्या सिनेटमधून नामनिर्देशित व्यक्ती

२ - सदस्य - संस्थेचा नावाजलेला स्नातक (Alumni)- नियामक मंडळातर्फे नामनिर्देशित/ निवडलेल्या व्यक्ती.

१ - सदस्य - संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई (पदसिध्द)

१ - सदस्य - मूळ विश्वस्तांचे प्रतिनिधी (विशेष निमंत्रित)

१ - सदस्य - संचालक, स्वायत्त संस्था (पदसिध्द) - सदस्य सचिव